**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास वकील श्री. एस. जी. पारखे यांचेतर्फे शपथेवर पुन्हा सुरु :–**

**१३.** मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी सदर प्रकरणात निशाणी क्रमांक २८ वर्णनयादीसह पोलिस स्टेशन अधिकारी, बेलापुर यांच्याकडे दिनांक २६/११/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारची स्थळप्रत दाखल केली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर प्रतला **निशाणी क्रमांक २९** देण्यात येते. मा. पोलिस अधिक्षक, दिलासा सेल, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर येथे सामनेवाला विशाल शिंदे यांनी अर्ज दिला होता त्या अर्जाच्या अनुषंगाने माझे बयान दिनांक ०१/०९/२०२३ रोजी भरोसा सेल, अहमदनगर येथे नोंदविण्यात आले होते. आता मला सदर जबाबची सत्यप्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्रमांक ३०** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास सामनेवाला करिता वकील श्री.एस. डी. खर्डे यांच्यातर्फे–**

**१४.** माझे लग्न सामनेवाला याच्यासोबत केशव गोविंद बनामध्ये झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमचे लग्न साध्या पध्दतीने मंदिरात केवळ माळ टाकून लावण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर पासुन तर सन २०२३ पर्यंत या कालावधीमध्ये मी सामनेवाला सोबत नांदत असतांना त्याच्याविरुद्ध कोणत्याही पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.२ याचा जन्म होईपावेतो आमचा संसार सुरळित चालु होता. दिनांक ०४/०१/२०२४ रोजी मी माझ्या माहेरी आली आहे त्यानंतर मी सामनेवालाकडे नांदावयास गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याने दिलासा सेल, अहमदनगर येथे दिनांक २४/०५/२०२३ रोजी अर्ज दिला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने चौकशी झाल्यानंतर मी सामनेवाला याच्याकडे नांदावयास गेली होती. त्यावेळेस मी सामनेवाला याच्याकडे चार महिने नांदले होते.

**१५.** सामनेवाला याच्यासोबत लग्नापुर्वी त्याचे वडील हे अपंग असल्याबाबत मला व माझ्या आई वडीलांना माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याच्या आईला

पॅरालिसिसचा अटॅक आलेला असून त्यांना कोणतेही काम होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला याच्या आई वडीलांकडे लक्ष देत नसल्यामुळे त्यांच्याकडे लक्ष देण्याकरिता मला सामनेवाला वारंवार सांगत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या आईच्या सांगण्यावरुन माझ्या सासु सास–यांना त्रास देत असे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला हा त्याच्या आई वडीलांना एकुलता एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याच्या आई वडीलांची संपुर्ण जबाबदारी ही त्याच्यावर आहे.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याच्या नावे शेतजमिन नाही. सामनेवाला याचा दुध व्यवसाय असल्याबाबत मी आजपावेतो सदर प्रकरणात कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याचा कोणताही दुधाचा व्यवसाय नाही. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याने नांदावयास येण्याकरिता मला नोटीस पाठविलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला नोटीस मिळून सुध्दा मी सामनेवालाकडे नांदायला गेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याने नांदावयास येण्याकरिता माझ्याविरुद्ध अहमदनगर येथील न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मी हजर होवून सामनेवाला याच्यासोबत नांदावयास जाण्याकरिता विदयमान न्यायालयासमक्ष नकार दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्या आईच्या नावे असलेली शेतजमीन ही कोरडवाहु शेतजमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा रोजमजुरीने काम करीत असून त्यास दररोज २५०/– ते ३००/– रुपये मिळतात.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४/०१/२०२४ रोजी मी सामनेवाला याच्या घरुन माहेरी येतांना माझे सर्व कपडे लत्ते, दागदागिने सोबत घेवून आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला यास माझ्या माहेरी राहावयास चल असे म्हणुन तगादा लावत असे. सामनेवाला याने मला फोनद्वारे धमकी दिली हे दाखविण्याकरिता मी फोनवरील सर्व संभाषण रेकॉर्डींग प्रकरणात दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने मला फोनवर कोणतीही धमकी दिली नसून सदर प्रकरणात पुरावा तयार करण्याच्या उद्देशाने मी सामनेवाला याच्याविरुद्ध खोटी रिपोर्ट दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.२ च्या जन्माच्या वेळेस लागणारा सर्व दवाखान्याचा खर्च हा सामनेवाला याने केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्यापेक्षा माझ्या आई वडीलांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरची व सासरची दोघांचीही परिस्थिती गरीबीची आहे.

हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यास त्याच्या आईवडीलांच्या दवाखान्याचा खर्च करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःच्या इच्छेने अर्जदार क्र.२ मुलाला घेवून माझ्या माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याची मला व अर्जदार क्र.२ ला स्वतंत्ररित्या पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोटगी मिळण्याच्या उद्देशाने मी सामनेवाला याच्याविरुद्ध सदर खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी भाडोत्री घरामध्ये राहत नसुन मी आजरोजी आई वडिलांकडे माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला स्वतंत्ररित्या पोटगी रकमेची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बेलापुर येथे आशासेविका म्हणुन कामास आहे. हे म्हणणे खरे नाही की, आशासेविका होण्याकरिता लागणारे शिक्षण मी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ सामनेवाला यास त्रास देण्याच्या उद्देशाने सदर केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

JITENDRA DUDHRAM JADHAO
Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2025.12.16 14:53:04 +0530

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : १६/१२/२०२५.